संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मुली आणि महिलांचे युग

**सध्याचे** युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग जरी असले तरीही भारतातील सर्वच क्षेत्रांमध्ये महिला आणि मुलींचे युग सुरू झालेले दिसते. राज्यात नुकताच जाहीर झालेला बारावीचा निकाल मुलींची मक्तेदारीच दर्शवणारा आहे. गेल्याच महिन्यात सीबीएससीचे ही निकाल जाहीर झाले. त्यामध्ये सुद्धा परीक्षेला बसलेल्या मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी असताना उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये मात्र मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त असते ही गोष्ट निश्चितच विचार करायला लावणारी आहे. आता तर बारावीच्या परीक्षेत जेवढ्या मुली बसल्या त्यापैकी ९० टक्के मुली उत्तीर्ण झाल्या केवळ १० टक्के मुलींना यश मिळवता आले नाही. मुलींच्या यशाचे हे आश्चर्यकारक प्रमाण फार मोठ्या सामाजिक बदलाचे निदर्शक ठरते. एकेकाळी मुलींना जास्त शिकू न देणारा समाज आज मात्र मुलींकडूनच शिक्षणाचे महत्त्व समजून घेऊ शकेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. एकीकडे महिला आणि पुरुष यांच्यात समानता असावी असा आग्रह धरला जातो, तर दुसरीकडे महिलांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावे अशी देखील मागणी होऊ लागते, परंतु महिलांना आरक्षणाची गरज नाही त्या आपल्या कर्तृत्वावर गुणवत्ता सिद्ध करू शकतात. फक्त गुणवत्ता मिळवलेल्या या विद्यार्थिनींना योग्य ती संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे आणि सरकारचे कर्तव्य ठरते. दुर्दैवाने ती व्यवस्था आपल्याकडे नाही आणि अनेक वेळा गुणवत्ता असूनही विद्यार्थिनींना मनासारखे उच्च शिक्षण घेता येत नाही किंवा नोकरीही मिळवता येत नाही. परंतु योग्य ती संधी मिळाली तर मुली किंवा महिला कुठेही मागे पडत नाही हेही अनेक वेळेला पाहायला मिळते. नुकत्याच संपलेल्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा यावेळी प्रथमच सर्वाधिक महिला खासदार निवडून आल्या तर देशभर झालेल्या एकूण मतदारांच्या संख्येमध्ये महिलांची संख्या वाढल्याचे पहायला मिळाले.

### गुणवत्तेतून समानता

यावेळच्या म्हणजे १७व्या लोकसभेमध्ये तब्बल ७२ महिला खासदार निवडून गेल्या आहेत. ही संख्या कदाचित पुढच्या निवडणूकीपर्यंत १००वर गेली तर भारतील राजकारणाचे स्वरुपच बदलू शकते. तीच परिस्थिती सर्वाधिक संख्येने मुली उत्तीर्ण होण्यामुळे निर्माण होईल कारण या गुणवान मुली समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकतील एवढेच नव्हे तर आयएएस, युपीएससी, एमपीएससी, आयएफएस ह्या सारख्या सनदी अधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेत मुलींची संख्या जास्त राहू शकते. सरकारी नोकऱ्यांमध्ये मुलींची संख्या वाढली तर त्याचा सुद्धा एक चांगला परिणाम पाहायला मिळू शकतो. राजकारण, समाजकारण, अर्थकारण एवढेच नव्हे तर देशाच्या सर्वप्रकारच्या सुरक्षायंत्रणांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू शकते. अशी परिस्थिती निर्माण होणे म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता येणे असा त्याचा अर्थ घेता येईल.पुरुषांनी स्त्रीला समान वागणूक द्यावी या समिकरणालाच फार मोठा छेद देण्याची क्षमता या विविध घटनांमधून सिध्द होते. स्त्री ही स्वतःच्या ताकदीवर किंबहुना कर्तृत्व आणि गुणवत्तेच्या निकषांवर समानता प्राप्त करू शकते. एकाअर्थी या सामाजिक परिवर्तनाला पुरुष वर्गाने जर मनमोकळी साथ दिली तर अनेक ठिकाणी महिलांची संख्या अधिक होऊ शकेल. ज्याप्रमाणे मतदान करण्याच्या प्रक्रियेतसुध्दा यावेळी महिलांचे प्रमाण जास्त राहिले हीच परिस्थिती प्रत्यक्ष महिला उमेदवार मोठ्या संख्येने निवडून येण्यापर्यंत बदलू शकते. ३३ टक्के आरक्षणाची भीक मागण्याची गरजही महिलांवर येणार नाही. या बदलाचे जाणीवपूर्वक स्वागत केले पाहिजे. कारण सध्या कॉर्पोरेट जगतामध्ये महिलांना तितकी समानता दिली जात नाही. कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डावरही एक दोनच महिला प्रतिनिधी असतात. ९९ टक्के कंपन्यांचे अध्यक्षपद पुरुषवर्गाकडेच असल्याचे पाहायला मिळते. अशावेळी निदान संचालक मंडळात तरी २५ टक्के महिला प्रतिनिधी असतील असा प्रयत्न झाला पाहिजे. महिलांच्या कर्तृत्वाचा गुणवत्तेचा किंवा प्रतिनिधीत्वाचा असाच वेग कायम राहिला तर तेसुध्दा सहजपणे घडून येईल. अशा काही घटना घडल्यानंतर काळ बदलतो आहे अशा शब्दात त्याचे वर्णन करतो परंतु ते एकतर्फी म्हणावे लागते. समाजातला एक मोठा वर्ग असलेल्या महिला याच काळ बदलवत आहेत असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरू शकते.

### महाराष्ट्राचा सन्मान

एकेकाळी याच महाराष्ट्रात महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ सावित्रीबाई फुलेंनी रोवली होती. अगदी स्वतःच्या घरात मुलींसाठी पहिली शाळा काढून महिला शिक्षणाविषयीची दूरदृष्टी दाखवून दिली होती. कालांतराने धोंडो केशव कर्वे एवढेच नव्हे तर रयत शिक्षण संस्थेमध्येसुध्दा मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र व्यवस्था केल्या गेल्या. आनंदीबाई जोशींसारखी पहिली महिला डॉक्टर हे महाराष्ट्राच्या महिलाविषयक शिक्षणाचे फार मोठे निदर्शक ठरले होते. आज खूप वेगाने महिलांनी सर्व क्षेत्रे काबिज केली आहेत. दहावी बारावीच्या निकालांमध्ये त्यांच्याकडून सिध्द होत असलेली गुणवत्ता महाराष्ट्राच्या तुऱ्यात नवे पिस खोवणारी आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. दुर्दैव असे आहे की समाजातले तथाकथित धुरीण किंवा समाजचिंतक या घटनेची दखल घेताना दिसत नाहीत.गेली काही वर्षे मुली उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढत असेल तर त्याचे समाज म्हणून काय काय परिणाम अनुभवायला येऊ शकतात याचा आढावा घेणे तितकेच गरजेचे ठरते. किंबहुना त्याबाबत विचारमंथन झाले पाहिजे. शेकडो प्रयत्न करून जी स्त्रीपुरुष समानता अस्तित्वात येत नव्हती ती गुणवत्तेच्या जोरावर प्रत्यक्षात आणण्याची जिद्द जर मुली दाखवत असतील तर सामाजिक परिवर्तनाची ती फार मोठी नांदी ठरते. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगासी उध्दारी असे वाक्प्रचार रुढ करून परंपरांचे जतन केले जात होते. त्या परिस्थितीला मागे टाकून जिच्या हाती शिक्षणाची दोरी ती समाजाची उध्दारी असे स्वरुप आज प्राप्त झाले आहे.